पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग, सिंधुदुर्गनगरी
E-Mail- sp.sindhudurg@mahapolice.gov.in
पोलीस नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्र. ०२३६२-२८२००/२२८००८
फॅक्स क्रमांक- ०२३६२-२२८२०५
पिनकोड- ४१६८१२



दि.२७/०४/२०२६

पोलीस शिपाई भरती सन २०२४-२०२५
तात्पुरती निवड यादी व तात्पुरती प्रतिक्षा यादी सूचना

१. पोलीस शिपाई पदाची तात्पुरती निवड यादी व तात्पुरती प्रतिक्षा यादी दि.२३/०४/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असून सोबतच्या यादी प्रमाणे निवड झालेल्या तसेच प्रतिक्षाधीन असलेल्या उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीसाठी त्यांची खालील नमूद मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे व सदर कागदपत्रांच्या सत्यप्रती केलेला छायांकित प्रतीचा एक संच, ४ पासपोर्ट साईज फोटो घेवून पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग येथे दि.२९/०४/२०२६ रोजी सकाळी ०९.०० वा. बिनचुकपणे हजर रहावे.

१) एसएससी/एचएससी/पदवी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र
२) जन्मदाखला/शाळा सोडल्याचा दाखला
३) अधिवास प्रमाणपत्र
४) जातीचे प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र
५) नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र
६) संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र
७) समांतर आरक्षणाकरीता दावा केलेले विहीत प्रमाणपत्र (महिला/खेळाडू/प्रकल्पग्रस्त/माजी सैनिक/पोलीस पाल्य/होमगार्ड इ.)
८) इडब्ल्यूएस प्रमाणपत्र
९) एसईबीसी प्रमाणपत्र
१०) एनसीसी सी प्रमाणपत्र

२. तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांची त्यांची मुळ कागदपत्रे व प्रमाणपत्रे ही विहीत शासन निर्णय, परिपत्रके व पोलीस भरती जाहीरात/कार्यपध्दतीमधील निर्देशानूसार पडताळणी झाल्यानंतर अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्यात येणार आहे.

३. सदर निवड यादीतील उमेदवारांची निवड तात्पुरती असून, तात्पुरत्या निवड यादीमध्ये नावाचा समावेश झाला म्हणून अगर कागदपत्र पडताळणीसाठी बोलाविल्यामुळे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

४. तात्पुरत्या निवडयादी व प्रतिक्षा यादीमधील निवड ही भरती निकषांची पुर्तता यांच्या अधिन असून त्यामध्ये अपात्र झाल्यास तात्पुरत्या निवड/प्रतिक्षा यादीमधील उमेदवाराचे नांव रद्द करण्यात येईल. याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा/तक्रार/हक्क राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

५. पोलीस भरती प्रक्रिये दरम्यान उपरोक्त मुद्यांप्रमाणे अथवा इतर न्यायोचित बदल/रद्द/सुधारणा करण्याचे/निर्णय घेण्याचे अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

(नयोमी साटम)
प्रभारी पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग